
ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०१८

विंदा करंदीकर **जन्मशताब्दी वर्ष** सांगता




ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

COLLEGE DEOLALI
IQAC
INTERNAL QUALITY ASSURANCE

समीक्षा

भास्कर ढोके

# शून्य एक मी
## चिंतनगर्भ कविता

'शून्य एक मी' या कवितासंग्रहातून कवीच्या विचारप्रक्रियेतील सातत्य जाणवते. या कवितेचे भावविश्व परंपरा आणि आधुनिकता यांच्या संधिकालातील आहे. ९०नंतर वेगाने होत जाणारे बदल, तंत्रज्ञानाने चकवलेली आधुनिकता, आंतरजालाने सपाट करून टाकलेले जग आणि त्यातून अतिक्रमित झालेला अतिरेकी व्यक्तिवाद, व्यवहारवाद आणि त्यातून उद्भवलेली अभूतपूर्व परिस्थिती हा या कवीच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. आधुनिकीकरणाच्या एका टप्प्यावर यंत्र बनविणारे यंत्र निर्माण होऊन मानवी श्रमाचे मूल्य अचानक घटल्याने जी परिस्थिती निर्माण झाली होती, तशीच काहीशी आताची स्थिती आहे. तेच भांबावलेपण आजही दिसते आहे. यंत्राच्या आक्रमणाची नेमकी जाणीव ज्याप्रमाणे मर्ढेकरांच्या कवितेतून मराठी काव्यविश्वाला झाली होती, तेच मूल्यभान पी. विठ्ठलच्या कवितेतून दिसते.

'शून्य एक मी' हा पी. विठ्ठल यांचा दुसरा कवितासंग्रह. मुद्रण सुलभतेने किंवा इतर कारणाने मराठी भाषेत कवितासंग्रहांचे मुबलक पीक आले आहे. या कविता अत्यंत आक्रस्ताळी, आवाजी, पसरट, सपाट किंवा केवळ काव्यात्म विधान करणा-या आहेत. दुसऱ्या बाजूला एकसुरी, व्यासपीठ गाजवणारी आणि स्वतःच्याच प्रेमात पडलेली कविता मोठ्या प्रमाणात दिसते आहे. या पार्श्वभूमीवर जे काही काव्यलेखन गंभीरपणे होताना दिसते आहे, त्यात पी.विठ्ठल यांच्या कवितांचा उल्लेख करावा लागतो. कविता हा काही केवळ शब्दांचा खेळ नसतो. गंभीर कविता नेहमीच चिंतनाच्या पातळीवर जाते. एक विचारव्यूह मांडत असते. पी. विठ्ठल यांच्या कवितांमधून या अपेक्षा बहुतांशी पूर्ण होतात. 'शून्य एक मी' या कवितासंग्रहातून कवीच्या विचारप्रक्रियेतील सातत्य जाणवते. या कवितेचे भावविश्व परंपरा आणि आधुनिकता यांच्या संधिकालातील आहे. ९०नंतर वेगाने होत जाणारे बदल, तंत्रज्ञानाने चकवलेली आधुनिकता, आंतरजालाने सपाट करून टाकलेले जग आणि त्यातून अतिक्रमित झालेला अतिरेकी व्यक्तिवाद, व्यवहारवाद आणि त्यातून उद्भवलेली अभूतपूर्व परिस्थिती हा या कवीच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. आधुनिकीकरणाच्या एका टप्प्यावर यंत्र बनविणारे यंत्र निर्माण होऊन मानवी श्रमाचे मूल्य अचानक घटल्याने जी परिस्थिती निर्माण झाली होती, तशीच काहीशी आताची स्थिती आहे, तेच भांबावलेपण आजही दिसते आहे. यंत्राच्या आक्रमणाची नेमकी जाणीव ज्याप्रमाणे मर्ढेकरांच्या कवितेतून मराठी काव्यविश्वाला झाली होती, तेच मूल्यभान पी. विठ्ठलच्या कवितेतून दिसते. महानगरीय जीवनाच्या अपरिहार्यतेचे वर्णन करताना मर्ढेकरांनी-

*'मी एक मुंगी, हा एक मुंगी*
*तो एक मुंगी, तू एक मुंगी,...*
*-आला आला स्वस्त दारावर आला हो आला*
*हा मुंग्यांचा लोंढा आला! खोला फाटक खोला !-*
*दहा दहाची लोकल गाडी*
*सोडीत आली पोकळ श्वास :*
*घड्याळाच्या काट्याचा अन्*
*सौदा पटला दीनउदास*

या कवितेतून मुंबई शहरातील एक विशिष्ट वास्तव मांडले आहे. मानवी जीवनाची होणारी घुसमट अर्थातच त्यांना अमानवी वाटते. ही मूल्यहीनता एका



S.V.K.T. COLLEGE DEOLALI CAMP
IQAC
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL

ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

*चप्पल, बूट, शर्ट, पँट, परफ्युम्स, पेन, गॉगल्स,*
*मोबाईल, कंडोम, कम्प्युटर,*
*जगण्याच्या कक्षेतल्या सगळ्याच वस्तू*
*माझ्यासकट होत गेल्या ब्रँडेड; पण मूठभर मातीत*
*ढीगभर सुख पेरणारा बाप अजून कसा नाही*
*झाला ब्रँडेड* (पृ.५२)

किंवा

*लोक म्हणतात कवीला कळतात माणसं. डोंबल!*
*अडतीस वर्षांत काय बघितले? बघितला गाव-*
*तांडा, वाडी-वस्ती, नगर-महानगर, गुरं-ढोरं,*
*झाडं-झुडपं,*
*राजदूत जावा होंडा-फेरी घरदार*
*देव्हात्र-शाळा कॉलेज*
*माणसं सतर. सभा संमेलनं हॉटेल-लॉज. समुद्राच्या*
*वाळूतही लोळून पाहिले, धर्म पाहिला,*
*दंगल पाहिली,*
*लरलर-बापूंची प्रवचने ऐकली.*
*हवे नको ते वाचून झाले.*
*गाथासप्तशती ते आषाढमाती.*
*माणसाच्या हजार जाती.* (पृ.८३)

या आणि अशा सर्वच कवितांमधून कवीची जीवनदृष्टी, चौफेर निरीक्षण, काव्यात्म अनुभवाला भिडण्याची क्षमता दिसते. जीवनातील विरोधाभास टिपते, संवेदनशीलतेने मांडते. नकारात्मक, स्वकेंद्री, व्यावहारिक जगाचे चित्र मांडतानाही ही कविता निराशावाद पेरत नाही तर एक आशेचा किरण दाखवते, मानवी संवेदना जागृत ठेवण्याचे सूचन करते. 'आपण एखादी कविता लिहूया' या कवितेत कवी म्हणतो,

*कविता माणसांच्या स्वप्नात खोल दडलेली असते*
*आपण आपल्या तळाशी थोडं डोकावून बघू या*
*आपण एखादी कविता लिहूया!*(पृ.५४)

भास्कर ढोके
चलभाष : ९४२३०८१०४६

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन

डॉ. द.ता. भोसले सार्वजनिक वाचनालय इसबावी (पंढरपूर) जि. सोलापूर व 'जिव्हाळा परिवार सेवाभावी संस्था, पंढरपूर' यांचे संयुक्त विद्यमाने 'राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार' व 'साहित्य सेवा पुरस्कार' देण्यात येणार असून साहित्यिकांनी आपल्या दिनांक १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत प्रकाशित झालेल्या आपल्या उत्कृष्ट साहित्यकृती दिनांक २८ फेब्रुवारी २०१८पर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. एकूण सहा पुरस्कार देण्यात येणार असून त्यातील एक पुरस्कार हा साहित्यसेवेसाठी असून इतर पाच पुरस्कार हे १) कथा, २) कादंबरी, ३) कविता, ४) चरित्र/आत्मचरित्र, ५) ललित समीक्षा या साहित्यप्रकारासाठी देण्यात येणार असून पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रोख रक्कम ५००१ रुपये, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे आहे.

सदरचे पुरस्कार एप्रिल २०१८मध्ये मान्यवर साहित्यिकांच्या शुभहस्ते पंढरपूर येथे प्रदान करण्यात येणार आहेत. तरी साहित्यिकांनी व प्रकाशकांनी आपल्या साहित्यकृतीच्या प्रत्येकी २ प्रती, अल्पपरिचय व फोटोसह आपला प्रस्ताव खालील पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

### साहित्यकृती पाठविण्याचा पत्ता

**श्री. कल्याणराव शिंदे** (अध्यक्ष)
सौरभ एज्युकेशन सेंटर
हॉटेल शामियाना समोर, स्टेशन रोड,
पंढरपूर, जि. सोलापूर ४१३ ३०४
संपर्क : ९४२०७७५४७६ / ८८३०१६२८५०

**ॲड. भारत भोसले** (अध्यक्ष)
जिव्हाळा परिवार सेवाभावी संस्था
पंढरपूर, जि. सोलापूर
पिन ४१४३०४
संपर्क : ९८२२८१९०८८



ATTESTED
PRINCIPAL
Smt. Vimlaben Khimji Tejookaya, Arts, Science & Commerce College
Deolali-Camp (Nashik

S.V.K.T. COLLEGE DEOLALI CAMP
IQAC
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL